# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

## महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०१८ (MAHATET)
## प्रवेश प्रमाणपत्राबाबत

रविवार दि.१५/०७/२०१८ रोजी आयोजित महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०१८ (MAHATET) करीता प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेश प्रमाणपत्रे परिषदेच्या संकेत स्थळावर (https://mahatet.in) उमेदवाराच्या लॉगईन ला उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. प्रवेश प्रमाणपत्राची प्रत उमेदवारानी परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व प्रत्यक्ष परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

प्रवेश प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास अर्ज सादर केल्याच्या तसेच विहित कालावधीत परीक्षा शुल्क भरल्याबाबतच्या आवश्यक पुराव्यासह कार्यालयात संपर्क साधावा.

परीक्षेच्या वेळी प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

परीक्षेस येताना उमेदवाराने ओळखीच्या पुराव्यसाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड व स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हींग लायन्सस यापैकी एक मूळ ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे. आधार कार्ड च्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेत स्थळावरुन ई-आधार सादर करणाऱ्या उमेदवाराच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवाराचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच ई-आधार वैध्य मानन्यात येईल.

परीक्षेच्या वेळी ऐनवेळी उद्‌भवू शकणाऱ्या अडचणी अथवा आंदोलने, मोर्चे, वाहतुक समस्या, अतिवृष्टी इ.बाबी लक्षात घेऊन विहित वेळेच्या पुरेसे आगोदर संबंधित परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. परीक्षा कक्षामध्ये विहित केलेल्या वेळेनंतर कोणत्याही परीस्थितीत उमेदवारांना परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

ठिकाण - पुणे
दिनांक - ३०/०६/२०१८

सुखदेव डेरे
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे.